Vol. 1, Issue II / March 2011, pp.126-129

Research Paper - Psychology

# 'राष्ट्रीय छात्रसेनेतील किशोरवयीन मुला-मुलींच्या व्यक्तिमत्वातील नियंत्रण केंद्राचा उपलब्धी प्रेरणेशी असणारा संबंध:एक तुलनात्मक अभ्यास'

**प्रा. पी.एस.बनसोडे**
संगमेश्वर महाविद्यालय, सोलापूर

**प्रस्तावना:**

सध्याचं युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक जण अधिकाधिक यशस्वी होण्यासाठी यथाशक्ती प्रयत्न करत आहे. अत्यंत धावपळ व मानसिक ताण असणाऱ्या या युगात व्यक्तीला स्वत: सक्षम असणं आणि सक्षम नसल्यास तसं बनण्यासाठी प्रयत्न करणं हे अत्यंत आवश्यक आहे.

एकविसावं शतक हे ज्ञानाचं शतक मानलं जातं. आपला नवीन शतकाचा प्रवास सुरु झाला आहे एकविसाव्या शतकात होणाऱ्या भारताच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये आपल्या युवा पिढीचा फार मोठा सहभाग असणार आहे. खरोखरच भारतीय युवा पिढी हीच एक फार प्रचंड शक्ती आहे. या शक्तीचा वापर करायचा असेल तर सर्वात प्रथम आपण आपली क्षमता ओळखली पाहिजे. अनेकदा आपल्याकडे उच्च क्षमता असूनही आपण आपल्या क्षमतेच्या खाली कुठल्यातरी पातळीवर काम करत असतो. आपल्या उच्च क्षमतांच्या योग्यते प्रमाणे यश मिळवायचं असेल तर ''आपण जिंकू शकतो'' हा आत्मविश्वास आपल्याकडे पाहिजे.

आयुष्यामध्ये प्रवास बऱ्याच वेळेला खडतर असतो. यश आणि अपयश दोन्हींना सामोरं जावं लागतं. अपयशानं खचून जाता कामा नये आणि यशानं हुरळून जाता कामा नये. म्हणूनच आपली यशस्वी कारकीर्द घडवण्यासाठी युवकांना विशेष प्रयत्न करावे लागतात. सुदैवाने भारतात राष्ट्रीय छात्र सेना, राष्ट्रीय सेवा योजना अशा प्रकारचे उपक्रम युवा पिढीसाठी राबविले जातात. अनेक युवक-युवती या संघटनाद्वारे घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमामंध्ये सहभाग घेऊन आपल्या व्यक्तिमत्वाचा विकास करण्याचा प्रयत्न करतात. सामान्य विद्यार्थी आणि यांच्या व्यक्तिमत्वामध्ये निश्चितच फरक आढळून येतो. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय छात्र सेनेतील मुला -मुलींच्या व्यक्तिमत्वातील नियंत्रण केंद्र आणि उपलब्धी प्रेरणा या दोन घटकांत काही संबंध आहे का? हा प्रश्न पुढे आला.

**उद्दिष्ट–**

राष्ट्रीय छात्र सेनेतील किशारेवयीन मुला-मुलींच्या व्यक्तिमत्वातील नियंत्रण केंद्राचा उपलब्धी प्रेरणेशी असणारा संबंध पाहणे.

**गृहितके–**

१. मुलींमध्ये अंतर्गत नियंत्रण व उच्च उपलब्धी प्रेरणा असते.
२. मुलामध्ये बहिस्थ नियंत्रण व निम्न उपलब्धी प्रेरणा असते.
३. मुलींमध्ये बहिस्थ नियंत्रण व निम्न उपलब्धी प्रेरणा असते.
४. मुलामध्ये अंतर्गत नियंत्रण व उच्च उपलब्धी प्रेरणा असते.

**संशोधन पध्दती–** Random Method

**नमुना निवड–** स्वैर पध्दत

**अभ्यासासाठी मिळवलेला प्रदत्त–**(प्रदत्त गोळा करण्याची साधने)

या अभ्यासासाठी आम्ही किशोरवयीन, महाविद्यालयीन सुमारे 60 N.C.C.Cadets तरुण-तरुणींचा गट निवडला, यामध्ये ३० तरुण आणि ३० तरुणी असे दोन गट केले. हे विद्यार्थी कला, शास्त्र, वाणिज्य, माहिती व तंत्रज्ञान या शाखांमध्ये शिक्षण घेतात. यांच्यापैकी काही विद्यार्थी शिक्षण घेतानाच अर्धवेळ नोकरी करतात.

हे विद्यार्थी N.C.C. च्या दुसऱ्या व तिसऱ्या वर्षात शिकत होते आणि त्यांनी N.C.C.च्या विविध शिबीरांमध्ये व स्पर्धामध्ये सहभाग घेतला होता.

**प्रकल्पासाठी निवडलेल्या किशोरवयीन मुला–मुलींचा वयो गट : १८ ते २२ वर्षे**

**परिक्षार्थींना देण्यात आलेली चाचणी–**

या अभ्यासासाठी आम्ही परिक्षार्थींना एकूण २ चाचण्या दिल्या.

१. लेव्हीन्सन्स स्केल फॉर लोकस ऑफ कंट्रोल

२. डॉ. व्ही.पी.भार्गव यांची उपलब्धी प्रेरणा चाचणी.

चाचणी घेण्यापूर्वी ६० तरुण- तरुणीपैकी सुमारे ४० विद्यार्थी -विद्यार्थीनींनी स्वत:चे निश्चित ध्येय ठरवले होते. या व्यक्तिंनी स्वत:चे आत्मपरिक्षण केले होते व काहींनी थोड्याफार प्रमाणात तसा प्रयत्न केला होता. म्हणजेच, हे विद्यार्थी स्वत:बाबत काही प्रमाणात तरी जागरुक होते.

**परिक्षार्थी विद्यार्थी –विद्यार्थीनीशी चर्चा केल्यानंतर समोर आलेले महत्वाचे घटक–**

वैचारिक गोंधळ व्यक्तीला निष्क्रीय बनवतो आणि हा वैचारिक गोंधळ कित्येक वेळेला बुध्दिमान आणि अभ्यासू व्यक्तींच्या वाट्याला येतो. परस्परविरोधी विचारप्रवाह व्यक्तीला निर्णय घेऊ देत नाहीत आणि निष्क्रिय बनवून टाकतात. परस्परविरोधी विचारांनी मन गोंधळून गेले की, साध्या बाबतीतही निर्णय घेता येत नाहीत.

कित्येक वेळा चांगली बुध्दीमान माणसेही जीवनात काहीच साध्य करु शकत नाहीत. बुध्दीमान असल्यामुळेच त्यांना सारे काही शक्य वाटते आणि जे जे शक्य आहे, तेते सर्व करण्याचा प्रयत्न अशा व्यक्ती करतात. म्हणूनच त्यांच्या आयुष्यात त्यांच्या हाती काहीच लागत नाही. कुशाग्र बुध्दीमत्ता असली तरी चंचल बुध्दी मात्र, यशाचे शिखर गाठू शकत नाही. याच कारणे अनेक बुध्दीमान, प्रज्ञावंत आणि अभ्यासू व्यक्ती सुध्दा जीवनात पराभूत होतात.

साध्या सरळ मनाच्या व्यक्ती जीवनात निर्णय घेताना अनेकदा गोंधळून जातात. निर्णयाचे कोणतेही ठोस आखीव-रेखीव मार्ग उपयोगी पडू शकत नाहीत. प्रत्येकाचे जीवन म्हणजे रुळलेली पायवाट किंवा राजमार्ग नाही. तसे असते तर, कोणतेही निर्णय घेणे सोपे गेले असते.

सध्याचे सामाजिक वातावरण हे कमालीचं दूषित झालेले आहे. कारण प्रत्येक व्यक्तिमत्वासाठी पुढील गुण वैशिष्ट्ये आवश्यक असतात, असे मत व्यक्त केले.

**प्रकल्पासाठी निवडलेल्या किशोरवयीन विद्यार्थी–विद्यार्थीनीच्या दृष्टिकोनातून आदर्श व्यक्तिमत्वासाठी आवश्यक असणारी आदर्श गुण वैशिष्ट्ये–**

१. कोणत्याही परिस्थितीत जुळवून घेता येणे.

२. शिस्त

३. स्वावलंबन

४. दीर्घोद्योगीपणा

५. प्रामाणिकपणा

६. समाधानी वृत्ती

७. निर्भयता

८. चिकाटी

९. कार्यतत्परता

१०. अभ्यासू/जिज्ञासू वृत्ती

११. त्याग

१२. राष्ट्रप्रेम

विविध विषयांवर या विद्यार्थ्यानी मनमोकळी अनौपचारिक चर्चा करताना या विद्यार्थ्याना सामाजिक समस्यांचे भान व गांभीर्य असल्याचे प्रकर्षाने जाणवत होते. तथापि, विद्यार्थ्यापेक्षा विद्यार्थीनी अधिक मुद्दे सुदपणे व सकारात्मक दृष्टिकोनातून त्यांची मते व्यक्त करीत होत्या.

दुष्प्राप्य गोष्टी साध्य करण्यासाठी दीर्घ काळ व सतत प्रयत्न करणे, एकच विशिष्ट ध्येय ठरवून ते साध्य करण्यासाठी कष्ट करणे, स्वत:मध्ये असणाऱ्या प्रबळ इच्छाशक्तीच्या वापर करुन यश मिळविणे ही सर्व वर्तन वैशिष्ट्ये प्रत्येक व्यक्तीमध्ये असावती, असे मत या विद्यार्थी-विद्यार्थीनींनी व्यक्त केले.

या विद्यार्थी-विद्यार्थीनींशी चर्चा केल्यानंतर काही गोष्टी प्रकर्षाने जाणवल्या. त्या गोष्टींचा उल्लेख करणे महत्वाचे ठरेल-

१. विद्यार्थी स्व:च्या Career बाबत व भविष्याबाबत काहीसे बेफिकीर होते. त्यांच्या तुलनेत , विद्यार्थीनींनी आपल्या Career बद्दल अधिक विचार केला होता.

२. विद्यार्थ्यांच्या निर्णय क्षमतेवर आणि व्यक्तिमत्वावर मित्र, अनेक प्रथितयश उद्योगपती, चित्रपट अभिनेते, यशस्वी खेळाडू, उच्चपदस्थ पोलिस अधिकारी व उच्चपदस्थ Army मधील अधिकारी यांचा अधिक प्रभाव जाणवत होता. तसेच, या व अशा व्यक्तींचे आदर्श त्यांनी स्वत:समोर ठेवले होते.

३. बहुतांश विद्यार्थीनींनी मात्र स्वत:च्या शिक्षणावर अधिक लक्ष केंद्रित केल्याचे दिसले.

४. आयुष्यातील , Career मधील यापूर्वी मिळालेल्या यशाचे श्रेय विद्यार्थ्यांनी स्वत:ला व पालक, शिक्षण, मार्गदर्शक इ.ना. दिले. मात्र, अपयशाची जबाबदारी मात्र स्वत: न स्वीकारता, बाह्य घटकांमुळे म्हणजेच परिस्थितीमुळे अपयशाला सामोरे जावे लागले, अशी कारणमींमांसा केली.

५. विद्यार्थीनींना देखील यश व सकारात्मक गोष्टींचे श्रेय स्वत:ला व इतर आदर्श व्यक्ती आणि परिस्थितीला दिले. मात्र, महत्वाची गोष्ट म्हणजे-

आयुष्यात व Career मध्ये आलेल्या अपयशाला आपण स्वत:देखील काही प्रमाणात जबाबदार होतो, हे त्यांनी मान्य केले. तसेच भविष्यात देखील अपयशावर आपण पूर्व नियंत्रण मिळवू शकतो. तसेच बाह्य परिस्थितीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवू शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला.

**तक्ता ⁄ मां - १**

**Locus of Control**

| | Girls | Boys |
|---|---|---|
| External | ०६ | ०९ |
| Chance | ०२ | ०१ |
| Internal | २२ | २० |

**Achievement Motivation**

| | Girls | Boys |
|---|---|---|
| High | १९ | १७ |
| Average | ०६ | ०६ |
| Low | ०५ | ०७ |

| | Girls | Boys |
|---|---|---|
| Total | ३० | ३० |

**तक्ता ⁄ मां - २**

| Locus of Control | Achievement Motivation | Students | |
|---|---|---|---|
| | | Girls | Boys |
| External | High | ०४ | ०३ |
| Chance | High | ०२ | ०० |
| Internal | High | १३ | १४ |
| External | Average | ०१ | ०२ |
| Chance | Average | ०० | ०१ |
| Internal | Average | ०५ | ०३ |
| External | Low | ०१ | ०४ |
| Chance | Low | ०० | ०० |
| Internal | Low | ०४ | ०३ |
| Total No. of Students | | ३० | ३० |

गोळा केलेल्या नमुन्याला वरील दोन्ही चाचण्या दिल्यानंतर आलेल्या निष्कर्षांचे सांख्यिकी शास्त्रानुसार "T"मूल्य काढले.

t(cal) = 0.62683098

t(tab)= 2.000

58@5%level of significane

If F t(cal) <F t(tab)then accept the Hypothesis.

0.6168308<2.000

We accept the hypothesis @5% level of significance

**विवेचन–**

खरे पाहता, योग्य वयात व्यक्तीला योग्य दिशा मिळाल्यास व्यक्ती एक उत्तम व आदर्श व्यक्तिमत्व म्हणून समाजात प्रसिध्द होऊ शकते. म्हणूनच व्यक्ती घेतात ते शिक्षण , व्यावसायिक प्रशिक्षण, त्यांचे छंद, अभिरुची, कुटूंबीय या साऱ्याच गोष्टी त्यांच्या एकूणच व्यक्तिमत्व विकासाला फार महत्वाचा हातभार लावतात. त्यामुळेच, व्यक्तीला सर्वप्रथम स्वत:चीच ओळख पटली पाहिजे. स्वत:ला स्वत:ची खरी आणि संपूर्ण ओळख पटणे हे माझ्या व्यक्तिगत दृष्टिकोनातून वैयक्तिक प्रगतीच्या दिशेने टाकलेले महत्वाचे पाऊल ठरेल.

**निष्कर्ष–**

या शोधनिबंध प्रकल्पात N.C.C.Cades चा अभ्यास करत असताना पुढील निष्कर्ष मिळाले.

१. विद्यार्थी-विद्यार्थीनींमध्ये तुलनात्मकरित्या सांख्यिकीय दृष्ट्या फारसा लक्षणीय फरक दिसून आला नाही.
२. तथापि, विद्यार्थ्यापेक्षा विद्यार्थीनी त्यांच्या वर्तनाबाबत अत्यंत जागरुक व अधिक विचारी असल्याचे दिसून येते.
३. विद्यार्थीनींमध्ये अंतर्गत नियंत्रण व उच्च उपलब्धी प्रेरणा असते, असेआढळले.

**मर्यादा–**

या शोधनिबंध प्रकल्पाच्या महत्वाच्या मर्यादा पुढीलप्रमाणे-

१. शोधनिबंध प्रकल्पासाठी गोळा केलेला नमुना हा संख्येने कमी आहे. नमुना संख्या वाढवल्यास कदाचित विद्यार्थी-विद्यार्थीनींच्या व्यक्तिमत्व नियंत्रण केंद्र व उपलब्धी प्रेरणा यामधल्या ‘सहसंबंधाचे काही वेगळे परिणामकारक निष्कर्ष’ मिळू शकतील.
२. हा प्रकल्प बालकामगार, नोकरी करत शिक्षण घेणारे विद्यार्थी, गृहविज्ञान महाविद्यालयातील विद्यार्थीनी, व्यावसायिक अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी यांच्यावरही करता येईल.
३. हा शोध निबंध १८ ते २२ वर्षे वयोगटाच्या विद्यार्थ्यावर आधारित होता. मात्र वयोगट वाढवल्यास कदाचित वेगळे व अधिक परिणामकारक निष्कर्ष मिळू शकतील.
४. हा प्रकल्प विद्यार्थ्याचे पालक, शाळेत शिकविणारे शिक्षक-शिक्षिका, विविध संस्थामधील जनसंपर्क अधिकारी, समाजाच्या विविध स्तरात समाजकार्य करणाऱ्या व्यक्ती यावर देखील करता येईल**संदर्भाची यादी –**

१. माहिती पुस्तिका-लेव्हीन्सन्स स्केल फॉर लोकस ऑफ कन्ट्रोल
२. माहिती पुस्तिका-डॉ-भार्गव यांची उपलब्धी प्रेरणा चाचणी
३. Various magazines of Psychological Studies.
४. Magazine University News
५. प्रायोगिक मानसशास्त्र-लेखक भरत देसाई
६. प्रायोगिक मानसशास्त्र-लेखिका कुसुम दामले..